| MHBI100015262022 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल तारीख | :- | १७.०८.२०२२ |
| | नोंदणी तारीख | :- | १७.०८.२०२२ |
| | निकाल तारीख | :- | १८.०३.२०२६ |
| | कालावधी | :- | वर्ष महिने दिवस<br>०३ ०७ ०१ |

# प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, केज यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी :- सुरेश एस.बडगुजर)

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ३५०/२०२२**

**निशाणी- २३/ब**

**स्वाती भ्र. उध्दव सावंत,**
वय २७ वर्ष, कामधंदा- घरकाम ,
रा. कुप्पा, ता. वडवणी जि. बीड
ह.मु. लाडेगांव, ता. केज, जि. बीड **.... अर्जदार**

**..विरूध्द..**

**उध्दव पि. कल्याण सांवत,**
वय ३० वर्ष, कामधंदा- शेती व नौकरी ,
रा. इंद्रायणी नगर, कुप्पा, ता.वडवणी, जि. बीड **.... गैरअर्जदार**

-----------------------------------------

अर्जदारा तर्फे विधिज्ञ श्री एस. एन. अंबाड साहेब
गैरअर्जदार तर्फे विधिज्ञ श्री आर. व्ही. खोडसे साहेब

-----------------------------------------

## न्यायनिर्णय

(निकाल दिनांक १८ /०३ /२०२६)

अर्जदाराने गैरअर्जदाराविरूध्द कलम १२५ फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये पोटगी मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

०२. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार व गैरअर्जदार यांचा विवाह दि. ०२.०६.२०२० रोजी धारुर येथे हिंदु धर्मशास्त्र परंपरेनुसार झाला आहे. अर्जदाराच्या आई–वडीलांनी लग्नात मानपान म्हणून पाचतोळे सोने, कपडेलत्ते, वर दक्षिणा व संसार उपयोगी संपुर्ण भांडे, फर्निचर इत्यादी दिले आहे. अर्जदार व गैरअर्जदार यांच्यातील पती पत्नीचे नाते अद्याप कायम असुन, गैरअर्जदाराने अर्जदार हिस विवाह संबंधातुन कोणतेही अपत्य होवू दिलेले नाही.

०३. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, अर्जादार लग्नानंतर गैरअर्जदारकडे कुप्पा ता.वडवणी येथे एक महिना नांदली. त्यानंतर गैरअर्जदार जुलै–२०२० मध्ये पुणे येथे अर्जदारास नोंदण्यासाठी घेवुन गेला. गैरअर्जदार हा पुणे येथे कार्यरत असलेल्या स्मॉल फायनान्स बँकेतील मुलीसोबत तास न तास मोबाईलवर बोलत होता. याच कारणावरुन अर्जदाराने विचारणा केली असता, गैरअर्जदाराने अर्जदारास ऑगस्ट–२०२० मध्ये मारहाण करुन धारुर येथे आणुन सोडले. तेंव्हापासुन अर्जदारास नाईलाजास्तव आई वडीलांकडे रहावे लागले. त्यानंतर गैरअर्जदार यास अर्जदाराचे आई वडीलांनी विनंती केली असता गैरअर्जदाराने अर्जदारास ऑक्टोबर २०२० मध्ये परत पुणे येथे घेवुन गेला. त्यानंतर २० ते २५ दिवस चांगले सांभाळले. त्यानंतर गैरअर्जदार दारुच्या आहारी गेला व बाहेरख्याली झाला. गैरअर्जदाराने अर्जदारास नोंव्हेबर २०२० पासुन हाकलुन दिले. तेंव्हापासुन अर्जदार ही मामाकडे लाडेगांव येथे राहत असुन जिवन जगते. अर्जदारास स्वतःची उपजिवीका भागविण्यास कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. अर्जदार ही स्वतःचा चरितार्थ चालविण्यास असमर्थ आहे.

०४. गैरअर्जदार हा एच.डी.एफ.सी.बँक सिंहगड रोड येथे नोकरीस असुन त्यास दरमहा ८० ते ९० हजार रुपये मिळतात. याशिवाय गैरअर्जदार कुप्पा ता.वडवणी येथे

बागायती पाच ते सहा एक्कर जमीन असुन ऊसाचे उत्पन्न घेतो. तसेच गैरअर्जदाराकडे दुभती जनावरे आहेत. शेती पासुन दरसाल खर्च वजा जाता ५ ते ६ लाख रुपयांचे उत्पन्न व दुधाचे उत्पन्नातुन दरमहा १५ ते २० हजार रुपये मिळतात. एकुण दरसाल गैरअर्जदाराचे १५ ते १६ लाखाचे उत्पन्न आहे. त्यामुळे अर्जदारास दरमहा रक्कम १०,०००/– रुपये पोटगी देण्याची अर्जदाराने विनंती केली आहे.

०५. गैरअर्जदार यांनी निशाणी क्र.१० वर म्हणणे सादर केले. अर्जदाराने गैरअर्जदाराशी नातेसंबंध मान्य करुन अर्जदाराने इतर केलेली कथने नाकारली आहेत. गैरअर्जदाराने कथन केले की, अर्जदार ही गैरअर्जदारास माझा विवाह तुमच्यासोबत मनाविरुध्द व बळजबरीने झाला आहे, तुम्ही मला पसंत नाही, असे सांगत असे. अर्जदार गैरअर्जदाराच्या आई–वडीलांचा अपमान करुन टोचुन बोलुन विनाकारण कलह निर्माण करत असे. अर्जदार सतत भांडण–तंटे करत असल्याने गैरअर्जदार याने अर्जदारास कर्वे नगर येथे नांदण्यास घेवुन गेला परंतु अर्जदाराचे स्वभावात बद्दल झाला नाही. गैरअर्जदारावर संशय घेवुन व भांडण तंटा करुन गैरअर्जदारास उपाशी ठेवणे, शारिरीक सुख न देणे, चारचौघात गल्लीच्छ आरोप घेणे अशा प्रकारचा शारिरीक व मानसिक त्रास अर्जदाराने गैरअर्जदारास दिला आहे. अर्जदार ही ऑगस्ट २०२० मध्ये न सांगता माहेरी निघुन गेली. गैरअर्जदाराने नांदण्याची विनंती केल्यास अर्जदाराने गैरअर्जदारास स्पष्टपणे इन्कार केला आहे.

०६. गैरअर्जदार याचा दिनांक ०६.०३.२०२२ रोजी अहमदनगर येथे अपघात झाला असुन गैरअर्जदारास गंभीर इजा झाली आहे. त्यामुळे गैरअर्जदार कोणतेही शारिरीक श्रम करण्यास असमर्थ झालेला आहे. गैरअर्जदार याचेवर आजपर्यंत उपचार चालु आहेत. गैरअर्जदार दरवर्षी १५ ते १६ लाख उत्पन्न कमवत नाही. गैरअर्जदार वडीलांसोबत शेतीच्या कामामध्ये मदत करतो व लोकांच्या शेतांमध्ये शारिरीक क्षमतेला त्याला झेपेल अशी मजुरी करुन महिन्याला २ ते ३ हजार रुपये कमवतो. गैरअर्जदारास केवळ कोरडवाहु दोन एकर जमीन आहे. अर्जदाराचे माहेर मौजे धारुर ता.धारुर येथे आहे. अर्जदाराचे सासर मौजे कुप्पा ता.वडवणी येथे आहे. त्यामुळे धारुर व कुप्पा हे गांव मा.न्यायालयाच्या कार्यक्षेत्राबाहेरील आहे. मा.न्यायालयास सदरचा अर्ज चालविण्याचा अधिकार नाही. सबब अर्जदाराचा अर्ज बनावटी व काल्पनिक स्वरुपाचा असल्याने प्रस्तुतचा अर्ज खर्चासह

नामंजुर करण्याची विनंती गैरअर्जदाराने केली आहे.

०७. अर्जातील कथने व गैरअर्जदार याचे म्हणणे यांचा विचार करता प्रस्तुत प्रकरणाच्या निवाडयाकरिता खालील प्रश्न माझ्या समक्ष समोर उपस्थित होतात. त्यांचा निष्कर्ष कारणासह खालील प्रमाणे नोंदवत आहे.

| | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदार याने योग्य कारणाशिवाय अर्जदाराचे पालन पोषण करण्याचे नाकारले व तिला दुर्लक्षित केले ही बाब अर्जदाराने सिध्द केली आहे काय? | होय |
| २. | न्यायालयास अर्ज चालवण्याचा अधिकार आहे काय? | होय |
| ३. | गैरअर्जदार याची आर्थिक परिस्थिती खावटी/पोटगी देण्यासारखी आहे हे अर्जदाराने सिध्द केले आहे काय? | होय. |
| ४. | अर्जदार तिचा उदर निर्वाह करण्यास असमर्थ असल्याचे तिने सिध्द केले आहे काय? | होय. |
| ५. | अर्जदार ही तिच्या मागणीप्रमाणे खावटी मिळण्यास पात्र आहे काय? | अंशतः होय. |
| ६. | आदेश काय? | अंतीम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

०८. अर्जदार क्र. १ ने स्वतःस निशाणी ११ वर तपासले आहे. तसेच तिच्या तर्फे साक्षीदार चंद्रशेखर बळीराम अंबाड यांचा पुरावा निशाणी १७ वर दिला आहे. तोंडी पुरावा व्यतिरिक्त अर्जदाराने निशाणी क्र.२२ वर मालमत्ता व दायित्व याबाबतचे शपथपत्र दाखल केले आहे. अर्जदाराने निशाणी क्र.१८ वर पुरसिस दाखल करुन पुरावा बंद केला आहे.

०९. गैरअर्जदार याने स्वतःला निशाणी क्र.२० वर तोंडी पुरावा दिला आहे. गैरअर्जदाराने कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. गैरअर्जदाराने निशाणी क्र.२१ वर

पुरसिस दाखल करुन पुरावा बंद केला आहे.

**१०.** अर्जदारा तर्फे विद्वान विधिज्ञ एस.एन.अंबाड यांनी युक्तिवाद केला की, अर्जदाराचे गैरअर्जदाराशी असलेले वैवाहिक संबंध हे विवादित नाहीत. गैरअर्जदाराने अर्जदारास मारहाण केली आहे. तिच्या उदरनिर्वाहाकरिता कोणतेही आर्थिक मदत करीत नाही. त्यामुळे अर्जदारास खावटी मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**११.** गैरअर्जदाराचे विद्वान विधिज्ञ खोडसे यांनी युक्तिवाद केला की, अर्जदाराचा अर्ज खोटा व बनावटी आहे. अर्जदाराचे माहेर मौजे धारुर आहे व अर्जदाराचे सासर मौजे कुप्पा ता.वडवणी आहे. सदरचा अर्ज चालविण्यास न्यायालयास अधिकार नाही. गैरअर्जदाराचा अपघात झाल्यामुळे गैरअर्जदार कसेबसे जीवन जगत आहे. गैरअर्जदार पोटगी देउ शकत नाही. सबब अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**<u>मुद्दा क्र. १</u>**

**१२.** वाद प्रश्नांची कारणमिमांसा करण्यापूर्वी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १९७३ चे कलम १२५ मध्ये लिखीत तरतुद नमूद करणे न्यायोचित ठरेल.

**<u>१२५. पत्नी, अपत्ये आणि आई बाप यांच्या निर्वाह करता आदेश –</u>**

१. पुरेशी ऐपत असताना जर कोणत्याही इसमाने

(क) स्वतः चा निर्वाह करण्यास असमर्थ असलेल्या आपल्या पत्नीचा अथवा

(ख) स्वतःचा निर्वाह करण्यास असमर्थ असलेल्या आपल्या औरस किंवा अनौरस किंवा अज्ञान अपत्याचा –मग ते विवाहीत असो वा अविवाहीत असो,
अथवा

(ग) त्यांचे सज्ञान झालेले औरस किंवा अनौरस अपत्य (विवाहीत मुलगी नव्हे ) कोणत्याही शारीरिक किंवा मानसिक अप सामान्यतेमूळे किंवा क्षती मूळे स्वतःचा निर्वाह करण्यास असमर्थ असेल, अशा अपत्याचा,
अथवा

(घ) स्वतःचा निर्वाह करण्यास असमर्थ असलेल्या आपल्या बापाचा किंवा आईचा निर्वाह करण्याबाबत उपेक्षा किंवा तो करण्यास नकार दिला तर, अशी उपेक्षा किंवा नकार शाबीत झाल्यावर प्रथम वर्ग दंडाधिकारी, अशा इसमाने आपल्या

पत्नीच्या अथवा अशा अपत्याचा अथवा बापाचा किंवा आईच्या निर्वाहाकरता अशा दंडाधिकारीला योग्य वाटेल त्या मासिक दराने भत्ता द्यावा आणि दंडाधिकारी वेळावेळी निर्देशित करील त्याने तो प्रदान करावा असा त्याला आदेश देवू शकेल.

**१३.** अर्जदार व गैरअर्जदार यांचा विवाह झाला असल्याचे, तसेच अर्जदार व गैरअर्जदार हे विभक्त रहात असल्याचे तथ्य गैरअर्जदाराने मान्य केले आहे.

**१४.** अर्जदाराने तिचे पुराव्याच्या शपथपत्रात निशाणी क्र.१ मधील कथनांचा पुर्नउच्चार केला आहे. अर्जदाराने शपथेवर कथन केले की, गैरअर्जदार रात्री अपरात्री बँकेतील मुलीसोबत तासनतास बोलत होता. याबाबत गैरअर्जदारास विचारणा केली असता गैरअर्जदाराने मारहाण करुन, गळा दाबुन दैनंदिन जीवे मारुन टाकण्याचा प्रयत्न केला व धमक्याही दिल्या तसेच अर्जदारास शारीरिक व मानसिक त्रास देत राहीला. अर्जदार माहेरी असतांना गैरअर्जराने अर्जदारास सांभाळण्यास व नांदवण्यास कसलाही प्रतिसाद दिला नाही. उलटतपक्षी अर्जदारास नांदवण्याचा स्पष्टपणे नकार दिला.

**१५**. उलटतपासात अर्जदाराने कथन केले की, ती बी.एस्सी ग्रॅज्युएट आहे. अर्जदाराने मान्य केले की, गैरअर्जदार तिला मारहाण करीत होता. गळादाबुन जीवे मारण्याचा प्रयत्न करत होता याबाबत तिने पोलिस ठाण्यात तक्रार दिली नाही. सदर साक्षीदाराने इतर सुचक प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिले आहेत.

**१६.** चंद्रशेखर (अ.सा.क्र.०२) याने सरतपासात कथन केले की, अर्जदार त्याची भाची असून गैरअर्जदार हा भाचेजावई आहे. अर्जदारास सन–२०२० च्या ऑगस्ट महिन्यात माहेरी सोडल्यापासून अर्जदार ही त्याचेकडे मौजे लाडेगाव ता.केज येथे राहत आहे. अर्जदार स्वतःचा चरितार्थ भागवण्यास असमर्थ आहे.

**१७.** उलटतपासात चंद्रशेखर (अ.सा.क्र.०२) याने कथन केले की, त्याचे शिक्षण बारावीपर्यंत झालेले आहे. अर्जदाराचे माहेर धारुर आहे. सदर साक्षीदाराने इतर सुचक प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिले आहेत.

**१८.** गैरअर्जदार याने साक्षी दरम्यान त्याचे जबाबातील कथनांचा पुर्नउच्चार केला

आहे. तथापि सदर साक्षीदाराने उलटतपासात मान्य केले की, तो अर्जदारास नांदवण्यास तयार आहे.

१९. अर्जदार व गैरअर्जदार यांच्यातील वैवाहिक संबंध हे विवादीत नाहीत. अर्जदाराच्या कथनानुसार गैरअर्जदाराने अर्जदारास मारहाण करुन गळादाबुन, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. अर्जदार तिच्या मामाच्या घरी राहत आहे. प्रस्तुत प्रकरणात अर्जदार व गैरअर्जदार यांनी परस्पर विरुध्द बाबी शपथेवर कथन केलेल्या आहेत. सदर प्रकरणात अर्जदाराच्या शपथेवरील पुराव्याविरुध्द गैरअर्जदाराचा शपथेवरील पुरावा असल्याने त्यात कोणाचा पुरावा विश्वासार्ह आहे हे बघणे आवश्यक आहे. अर्जदार ही एक विवाहित स्त्री असून कोणतीही विवाहित महिला सबळ कारणाशिवाय पती पासून विभक्त राहणार नाही. तसेच त्याचे विरुध्द विनाकारण न्यायालयात प्रकरण दाखल करणार नाही. विवाहित स्त्री विरुध्द केलेल्या मानसिक, शारिरीक व कौटुंबिक छळाच्या बाबी या सर्वसाधारणपणे चार भिंतीच्या आड असतात. कलम १२५ फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये दाखल प्रकरणात मानसिक, शारिरीक व कौटुंबिक छळाच्या बाबी संशयापलीकडे सिध्द करणे आवश्यक नाही. त्यामुळे स्वतंत्र साक्षीदार नेहमी असणे शक्य नाही. प्रस्तुत प्रकरणात देखील अर्जदाराच्या मामाने अर्जदाराच्या कथनाच्या समनार्थ साक्ष दिली आहे. गैरअर्जदाराने मान्य केले आहे की, अर्जदार माहेरी असतांना पालनपोषनाची व्यवस्था त्याने केली नाही. गैरअर्जदाराने उलटतपासात मान्य केले की, गैरअर्जदार अर्जदारास नांदवण्यास तयार आहे. पत्नीच्या उदरनिर्वाहाकरिता आर्थिक सहाय न करता केवळ तिला नांदवण्याची इच्छा दर्शविणे हि बाब पुरेशी नाही. गैरअर्जदार याने अर्जदाराच्या पालनपोषनाकरिता आर्थिक मदत केल्याबाबतचा कोणताही पुरावा पटलावर आणलेला नाही.

२०. वर नमुद सर्व बाबीचा साकल्याने विचार करता गैरअर्जदार याने अर्जदाराचे पालनपोषन करण्याचे नाकाराले व दुर्लक्षित केले हे सिध्द होत आहे. त्यामुळे **मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवत आहे.**

**<u>मुद्दा क्र.२ करिता</u>** :

२१. गैरअर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदाराचे माहेर हे मौजे धारुर जि.बीड येथील असुन अर्जदाराचे सासर हे मौजे कुप्पा ता.वडवणी जि.बीड येथील आहे. मौजे धारुर

व मौजे कुप्पा हे गांव मा.न्यायालयाच्या कार्यक्षेत्रातील नसल्याने सदरचा अर्ज चालविण्याचा पुरेपुर अधिकार या न्यायालयास नाही. त्यामुळे सदरचा अर्ज खारीज करणे योग्य व जरुरी आहे.

२२. प्रस्तुत मुद्दयाची कारणमिमांसा करण्यापूर्वी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १९७३ चे कलम १२६ मध्ये लिखीत तरतुद नमूद करणे न्यायोचित ठरेल

**(१) कलम १२५ खालील कार्यवाही कोणत्याही व्यक्तीविरुध्द :**

**(क) – ती व्यक्ती जेथे असेल, किंवा**

**(ख) – जेथे ती व्यक्ती किंवा त्या व्यक्तीची पत्नी राहत असेल, किंवा**

**(ग) – जेथे ती व्यक्ती आपल्या पत्नीबरोबर किंवा प्रकरणपरत्वे, अनौरस अपत्याच्या आईबरोबर निकटपुर्वी राहिली असेल, किंवा**

**(घ)– जेथे त्याचे वडील किंवा आई राहत असेल,**

अशा कोणत्याही जिल्हयात करता येईल.

२३. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदार ही मामाकडे लाडेगांव ता.केज येथे राहत आहे. तसेच चंद्रशेखर (अ.सा.क्र.२) याने कथन केले की, तो तीचा मामा असुन अर्जदार त्याचेकडे मौजे लाडेगांव ता.केज येथे राहत आहे. गैरअर्जदाराने अर्जदाराच्या राहण्याबाबतच्या कथनाचे खंडण केलेले नाही. अभिलेखावरील पुराव्यावरुन अर्जदार तिच्या मामाकडे मौजे लाडेगांव ता.केज येथे राहत असल्याचे स्पष्ट होत आहे. अर्जदार न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात राहत आहे. म्हणुन न्यायालयास प्रस्तुतचा अर्ज चालविण्याचे न्यायक्षेत्र आहे, म्हणुन **मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष 'होकारार्थी' नोंदवित आहे.**

**<u>मुद्दा क्र.३ करिता</u>** :

२४. अर्जदार हिने तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याचे नमुद केले आहे. गैरअर्जदार याने त्याला उत्पन्नाचे साधन नसल्याचे कथन केले आहे. परंतु, गैरअर्जदाराने उलटतपासात मान्य केले की, त्याचेकडे मालकीची दोन एकर शेती आहे व तो मजुरीसुध्दा करतो.

२५. मा.सर्वोच्च न्यायालयाने ***<u>रजनेश वि. नेहा व इतर, २०२०</u>***

***<u>एस.सी.सी.ऑनलाईन, एस.सी.९०३</u>*** या निवाडयात निर्देशित केल्यानुसार अर्जदार हिने मालमत्ता व दायित्वबाबतचे शपथपत्र निशाणी क्र.२२ वर दाखल केले आहे. गैरअर्जदाराने मालमत्ता व दायित्वबाबतचे शपथपत्र दाखल केलेले नाही. अर्जदाराने गैरअर्जदाराचे उत्पान्नाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. गैरअर्जदार याने कथन केले की तो मजुरी करतो. म्हणुन गैरअर्जदाराची परिस्थिती ही अर्जदारास पोटगी देण्यास सक्षम आहे, असा निष्कर्ष काढणे उचित होईल म्हणुन **मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष 'होकारर्थी' नोंदवित आहे.**

**<u>मुद्दा क्र.४ करिता</u>** :

२६. अर्जदाराच्या कथनानुसार तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. सदर बाब ही अर्जदाराने तिच्या पुराव्यात कथन केलेली आहे. सदर पुराव्याचे खंडण करण्यास गैरअर्जदारास यश आलेले नाही. अर्जदाराला उत्पन्नाचे साधन आहे हे दर्शविण्यास गैरअर्जदारास अपयश आलेले आहे. त्यामुळे **मुद्दा क्र.४ चे उत्तर 'होकारार्थी' नोंदवित आहे.**

**<u>मुद्दा क्र.५ करिता</u>** :

२७. अर्जदार ही तिच्या मामाकडे राहत असल्याचे पुराव्यावरुन स्पष्ट होत आहे. अर्जदाराचे कथनांनुसार गैरअर्जदार हा तिचे उदरनिर्वाहाकरीता कोणतीही आर्थिक मदत करत नाही. तसेच गैरअर्जदाराने देखील तो अर्जदाराच्या उदरनिर्वाहकरीता आर्थीक मदत करत असल्याबाबतचा कोणताही संयुक्तीक पुरावा पटलावर आणलेला नाही. गैरअर्जदाराने अर्जदाराचा सांभाळ करण्यास दुर्लक्ष केलेले आहे. अर्जदाराकडे तिच्या उदरनिर्वाहकरीता उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदार हा पोटगी देण्यास सक्षम आहे. अर्जदाराने दरमहा दहा हजार रुपये पोटगी मिळण्याची मागणी केली आहे.

२८. फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम १२५ नुसार अर्जदाराचे अन्न, वस्त्र व निवारा या बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. अर्जदाराने गैरअर्जदाराच्या उत्पन्नाबाबत कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाहीत. गैरअर्जदाराने कथन केले आहे की, तो मजुरी करतो. गैरअर्जदार मजुरी करतो असे गृहित धरले तरी देखील, त्याचे मासिक उत्पन्न रक्कम रुपये १०,०००/- ते १२,०००/- इतके नक्कीच आहे. तसेच त्याचेवर अवलंबुन इतर कोणी असल्याबाबतचा पुरावा पटलावर आलेला नाही. अशा परिस्थितीत दोन्ही बाजुचे

राहणीमान व गैरअर्जदार याचे उत्पन्न विचारात घेता अर्जदार हिला अर्ज दाखल तारखेपासुन प्रतिमहा रक्कम रुपये २,०००/–(दोन हजार रुपये) पोटगी देणे उचित होईल. त्यामुळे मुद्दा क्र.५ चा निवाडा वरिल प्रमाणे दिलेला आहे.

**मुद्दा क्र.६ करिता** :

**२९.** मुद्दा क्रमांक १ ते ५ वरील निष्कर्षांचा विचार करता, अर्ज अंशतः मंजुर होण्यास पात्र आहे. सबब मुद्दा क्र.६ च्या निवाडयाकरीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

१ अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२ गैरअर्जदार याने अर्जदारास प्रस्तुत प्रकरण दाखल तारखेपासुन म्हणजेच दिनांक १७.०८.२०२२ पासुन दरमहा रुपये रक्कम रुपये २,०००/–(दोन हजार रुपये) पोटगी म्हणुन दयावेत..

३ सदर आदेशाची प्रत अर्जदारास मोफत द्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SURESH SUBHASH BADGUJAR
Date: 2026.03.24 17:46:16 +0530

(**एस.एस.बडगुजर**)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, केज

दिनांक– १८/०३/२०२६

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

Dictated on : 18.03.2026
Transcribed on : 18.03.2026
Checked & signed on : 18.03.2026

Sd/-
( S.N.Kshirsagar ),
Junior Clerk
Ct. of CJJD and JMFC, Kaij.